| MHKO160002002017 | **नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०१७ मधील**<br><br>**निशानी क्र. ४१ वरील आदेश** |
| --- | --- |

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द दावा मिळकतीबाबत कायम मनाईकरिता दाखल केला असून सदर दाव्याची चौकशी सुरू आहे. प्रतिवादी यांनी कैफियतमध्ये दावा मिळकतीमधील हद्दीबाबत तसेच वर्णनाबाबत चुकीचे असलेची तक्रार दाखल केलेली आहे. वादी यांनी दावा दाखल करतेवेळी अनावधानाने दावा मिळकत खरेदी घेतलेले क्षेत्र चुकीचे नमुद झालेले आहे. तसेच चतु:सिमा चुकीची नमुद झालेली आहे. दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये सुस्पष्टपणे मे. कोर्टापुढे येणे योग्य व जरूरीचे आहे. त्यामुळे वादींना दावा अर्जी कलम १ मध्ये वरून तिस-या ओळीमध्ये गावच्या हद्दीतील यानंतर जुना गट नं. १८१ क्षेत्र हे.१.२२ आर. पो.ख.०.०२ आर. असे एकुण १.२४ आर. आकार रू.१.५३ पैसे यापैकी वादी यांनी खरेदी घेतलेली मिळकत हे. १.०४.८ आर आकार रू. १.३३ पैसे याचा हा मजकुर समाविष्ट करणेची विनंती केली आहे. तसेच दावा कलम १० मध्ये दावा मिळकतीच्या चतु:सिमेत पुर्वेस गट नं. २५२ ची मिळकत ऐवजी गट नं. १८१ पैकी प्रतिवादी यांची उर्वरित मिळकत असा मजकुर समाविष्ट करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. वादी यांनी मागितलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलत नाही. सदर दुरूस्तीमुळे वादी, प्रतिवादी यांचेमधील वाद निराकरण होण्यासाठी सदरची दुरूस्ती न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदरची दुरूस्ती मंजुर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदरची दुरूस्ती नामंजुर झालेस वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, वादीचा अर्ज मंजुर करण्यात यावा असे वादीने कथन केले आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास नि.४२ वर म्हणणे दाखल करून त्यांनी कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असल्याने त्यांना मान्य नसल्याचे कथन केले आहे. वादीचे अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. वादी यांनी सदरचा दावा

२०१७ रोजी दाखल केला आहे. सदरचा दावा चौकशीवर आहे व वादी यांनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र देखिल दाखल केलेले आहे. वादी यांचा उलटतपास घेणेस प्रतिवादी तयार होते व आहेत. वादी मागत असलेली दुरूस्ती ही मुळ दावा मिळकतीच्या विरुध्द आहे. वादी मागत असलेल्या दुरूस्तीमुळे मुळ दाव्यात अमुलाग्र बदल घडुन येणार आहे. सबब वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेत यावा अथवा सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादी यांचेवर कठोर कॉस्टवर मंजुर करण्यात यावा.

**०४.** मी वादी, प्रतिवादीं याचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील दाखल सर्व कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईकरीता दाखल केलेला होता. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये अधिकचा मजकुर समाविष्ट करणेची विनंती केलेली आहे. सदरचा मजकुर समाविष्ट केल्याने दाव्याचे मुळ स्वरूप बदलणार नाही. याउलट दाव्याचा अंतिम निकालासाठी फायदेशिरच होईल. सद्यस्थितीत वादी मागणी करत असल्याप्रमाणे दुरूस्ती केल्यास दाव्यातील गुंतागूंत वाढेल असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. याउलट वादी व प्रतिवादी यांच्यात उत्पन्न होणारे भविष्यातील वाद व वेगवेगळे दावे रोखण्यासाठी सदरच्या दुरूस्तीमुळे टाळता येतील. दोन्ही पक्षकारांमधील सर्व वादमुद्दे निकाली निघण्यासाठी सदरची दुरूस्ती करणे न्यायाच्या गरजेचे आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

**०१** अर्ज नि.४१ चा अर्ज प्रतिवादींना ३००/- रू. कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांनी अर्जामध्ये नमूद वादपत्रामधील दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दावा दुरूस्त प्रत न्यायातयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**दिनांक- २३/०१/२०२६** **( एस. डी. बागल )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**

**मलकापूर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर.**